# University of Mumbai



# Academy for Administrative Careers

## Admissions open for guidance/coaching for Competitive examinations (UPSC/MPSC) Preliminary Examination 2018

**Last date of receiving applications: 15/06/2017.**

**Entrance Examination on 25/06/2017 at 11.:00 am.**

**: For details contact :**

Academy for Administrative Careers, Room No. 4, 1st Floor, J.P. Naik Bhavan,
University of Mumbai Vidyanagari, Mumbai-98 Web: http://mu.ac.in/others/aac/courses.html

E-mail: director.aac@mu.ac.in Phone: 022-26543547 / 26530208

**I/C Director**
**Dr. A.S. Jadhav**

University of Mumbai

# स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन UPSC/MPSC प्रवेश देणे सुरू आहे.

स्पर्धापरीक्षेस बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंबई विद्यापीठच्या वतीने प्रशिक्षण वर्ग चालवले जात आहेत.पदवी पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या वर्गात सहभागी होता येईल. जे विद्यार्थी या परीक्षेस बसू इच्छितात अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश परीक्षा अर्ज दि. ११/०५/२०१७ पासून १५/०६/२०१७ पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ५.३०पर्यंत स्वीकारले जातील.

जे.पी.नाईक भवन, पहिला मजला,रू नं ०४. विद्यानगरी कलिना,सांताक्रुझ (पू), मुंबई—४०००९८. **दूरध्वनी: २६५४३५४७/२६५३०२०८.**

# मुंबई विद्यापीठात स्पर्धापरीक्षा संदर्भात अभ्यासक्रम प्रशिक्षण व मार्गदर्शन

भारतीय राज्य घटने नुसार लोकसेवा आयोगाची स्थापना केली गेली व शासकीय सेवक भरतीची जबाबदारी या आयोगाकडे सुपूर्द करण्यात आली. केंद्र सरकारच्या कक्षेत येणाऱ्या सेवांमध्ये श्रेणी १ व २ चे अधिकारी निवडण्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) कार्यरत आहे, तर महाराष्ट्र शासनाच्या सेवामध्ये अधिकारी निवडण्याचं काम महाराष्ट्र लोकसेवा आयोग(MPSC) करतं. या पदांच्या भरतीसाठी आयोग वेगवेगळ्या स्पर्धा परीक्ष्या घेत असतात. या व्यतरीक्त केंद्रीय कर्मचारी चयन आयोग सुद्धा इतर कार्माचारीयांची भर्ती स्पर्धा परीक्षा घेऊन करते.

शालेय तसेच महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांना या परीक्षांची नीटशी कल्पना नसते या परीक्षा चा अभ्यासक्रम काय असतो? या परीक्षांची तयारी करणारे नवीन विद्यार्थी पॅटर्न समजून घेण्यासाठी बराच वेळ घालवतात .यामुळे प्रत्यक्ष अभ्यासाला दिशा मिळण्यासाठी वेळ जातो. नेमका अभ्यास कसा करावा ? कोणत्या विषयाला किती वेळ द्यावा? अभ्यासाची सुरुवात कोणत्या विषयापासून करायची? या पदांसाठी वेगळा कोर्स आवश्यक आहे का? अनुभवाची गरज आहे का? पदवी परीक्षेत किती टक्के गुणांची आवश्यकता आहे? या व अशा बऱ्याच प्रश्नांच्या गोंधळात हे विद्यार्थी असतात. याचे कारण म्हणजे महाविद्यालयीन स्तरावर असणारी परीक्षा व ही परीक्षा या दोन्ही भिन्न आहेत. परीक्षांची तयारी करायची मग पूर्ण तयारी व योग्य मार्गानेच व्हायला हवी परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांमध्ये चिकाटी, जिद्द, मेहनत करण्याची तयारी, नियोजन, सातत्य, याबरोबरच संयम हादेखील गुण असायला हवा. परंतु त्यांना अभ्यास कसा करावा हेच कळत नाही,

याकरिता मुंबई विद्यापीठातील प्रशासकीय व्यासाय अकादमी तर्फे नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे . मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी पात्र/ प्राप्त अथवा शेवटच्या वर्षामध्ये असलेले उमेदवार या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात.

असेआढळून आले की स्पर्धापरीक्षाची तयारी करीत असताना अभ्यासासाठी दर्जेदार व विस्वसाहार्य साधने/ पुस्तके सापडणे कठीण असते. तसेच हे शोधणे सुध्दा बरेच वेळखाऊ व त्रासदायक असते यावर मात करण्यासाठी अकादमीने अनेक दर्जेदार व विश्वासहार्य साधने पुस्तके व नियतकालिके यांच्या रूपात उपलब्ध करुन दिले आहे. या व्यतिरिक्त विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू ग्रंथालयात जवळपास १४ लाखपेक्षा जास्त पुस्तके व ७०० नियतकालिके व मासिके आहेत. याचा फायदा अकादमीत प्रवेश घेणाऱ्यास होणार आहे.

विद्यापीठाच्या तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन या अभ्यासक्रमात मिळणार असल्यामूळे इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा असे विद्यापीठाच्या वतीने आव्हान करण्यातयेत आहे. या अभ्यासक्रमासाठी अर्जाचे शुल्क ५००रू. व पूर्व परीक्षेच्या सत्रासाठी शुल्क ३००० रू. आहे अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १५/०६/२०१७ आहे प्रवेश परीक्षा दि. २५/०६/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे. २०१८ च्या स्पर्धा परीक्षेकरिता सत्र सुरुवात व वर्ग जुलै २०१७ पासून सुरू होणार आहे. अधिक माहीतीसाठी संपर्क जे.पी.नाईक भवन, पहिला मजला,रू नं ०४. विद्यानगरी कलिना,सांताक्रुझ (पू), मुंबई—४०००९८. **दूरध्वनी: २६५४३५४७/२६५३०२०८.**

डॉ. अंबादास जाधव
प्रभारी संचालक
प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण अकादमी